# भारतातील मुस्लीम समाजातील दारिद्रयाची कारणे व उपाययोजना

**शेख आसेफ बाशाभाई**
संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद
मो. 9637594942
asefs931@gmail.com

## प्रस्तावना

जागतीक पातळीवर अनेक देश दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. दारिद्रयाचे अत्यंत किळसवाने रूप आपल्याला मुबंई, कोलकता, दिल्ली यासारख्या महानगरात दिसते. या महानगरात झोपडपट्टीत कित्येक लाख लोग राहतात. तसेच आकाशाच्या निळया छताखाली फुटपाथचा आश्रय घेउन जिवन जगण्यांची संख्याही प्रचंड आहे. भारताच्या ग्रामिण भागतही आपल्याला भीषण दारिद्रयाचे दर्शन घडते. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणारे व वस्त्र निवारा न प्राप्त होणारे तसेच अर्धनग्न, शरीर, रिकामे पोट, सपाट छाती, निस्तेज डोळे, आणि उदास चिंतातुन चेहरा हि सर्वसाधारण लक्षणे दिसणारी माणसे दृष्टीस पडणे हि आज नित्याचीच बाब झाली आहे.

जागतीक पातळीवर अनेक देश दारिद्रयाच्या दृष्टचक्रात अडकले आहेत. बुरूडी, कांगो, नायगर, मालावी, लायबेरीया, मोझांबिक, दक्षिण गाम्बिया, अफगानिस्तान यासारखे देश तर अत्यांतिक दारिद्रयाचा सामना करत आहेत. युरोपीयन व अमेरिकन साम्राज्यवादाच्या बळी ठरलेल्या वसाहती देशांवर राजकिय अधिपत्य प्रस्थापित करून तेथील नैसर्गिक साधन संपत्तीचे लुट केली व मानवी संसाधनाचे अत्यंतिक शोषण केले. साम्राज्यवादी देशाच्या या शोषणमुलक नीतीमुळे वसाहती राष्ट्रे दारिद्रयाच्या खाईत ढकलले गेले.

1947 साली भारतातील दारिद्रयेरेषेखाली लोकसंख्येचे प्रमाण 70 टक्के होते. 1993—1994 साली दारिद्रयाचे प्रमाण घटत 2601 टक्कयांर्पत खाली आले 2011 साली भारतातील 21.09 टक्के दरिद्रयरेषाखाली जिवन जगत होते. तेडुंलकर समितीच्या अहवाल नुसार 2011—2012 साली भारतात 270 दशलक्ष लोक दारिद्रयेरेषेखाली होते. भारता मधील काही राज्यमध्ये दरिद्रयाचे लोकसंख्या सर्वात जास्त आहे. बिहार, झारखंड, उडिसा, मध्यप्रदेश, छत्तिसगढ, उत्तरप्रदेश, उत्तराखंड या राज्यामध्ये दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे.

भारतातील मुस्लीम साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. त्यापैकी पुरूष साक्षरता 2 टक्के आहे आणि महिला साक्षरतेचे प्रमाण खुप कमी प्रमाणात आहे. 6 ते 14 वयोगटातील मुस्लीम मुलेपैकी पंचवीस टक्के मुले एकतर कधी शाळेत गेली नाही. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थिती वर मोठया प्रमाणात की होत राहीली. त्याच्या परिस्थिती मध्ये काही बदल झाला नाही. त्यामुळे दारिद्रयरेषाखाली मोठया प्रमाणात मुस्लीम समाजाची लोकसंख्या वाढत चालेली दिसुन येते. प्रस्तुत शोधनिबंधात संशोधक दारिद्रय म्हणजे काय हे स्पष्ट करून भारतातील मुस्लीम समाजामधील स्थिती, दारिद्रयाची कारणे आणि दारिद्रयाची निर्मुलनार्थ अभ्यासपुर्ण उपाय सुचविणार आहे.

## दारिद्रयाची संकल्पना

जागतिक पातळीवर दारिद्रयाची व्याख्या अणि दारिद्रयाचे परिमाण यात तफावत आढळते. याचे कारण जगातिल विविध देश. त्याची भिन्न — भिन्न संस्कृती समाजीक अर्थिक परिस्थिती यामध्ये असणारा फरक, भौलोलिक संरचना, हवामान व वातावरणातीत बदल, विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती इत्यादी घटकामध्ये तफावत असल्याने जागतिक पातळिवर दारिद्रयाची सर्व समान्य व निश्चित परिणाम प्रस्थापित होऊ शकले नाहीत मात्र काही निष्कष व्याख्यांच्या आधारा वर जगात दारिद्रयाचे अवलोकन व आकलन केले जाते.

**दारिद्रयाची व्याख्या**

मुलभुत गरजा भागविण्याची व्यक्तिीची किंवा कुटुंबीची असमर्थता म्हणजे दारिद्रय होय. मुलभुत गरजांचा अभाव म्हणजे दारिद्रय होय.

दारिद्रयाच्या संकल्पनेचे दोन प्रकार पडतात.यात साक्षेप दारिद्रय व निरपेक्ष दरिद्रय होय.

**साक्षेप दारिद्रय**

साक्षेत दारिद्रयाच्या संकल्पनेत विवीध गटातील लोकांच्या उत्पनाची तुलना केली जाते. त्या तुलनेत की उत्पन्न गटातील लोक गरीब समजले जातात. म्हणजे सापेक्ष दारिद्रयाची संकल्पना उत्पन्नाच्या विषय गटाशी संबध आहे. थोडक्यात लोकांचे उत्पन्नुसार गट करून त्या गटामध्ये कमी उत्पन्न असणारा गट म्हणजे सापेक्ष दारिद्रय होय.

**निरपेक्ष दारिद्रय**

किमान आवश्यक गरजा भागवण्याची क्षमता नसणे म्हणजे निरपेक्षा दारिद्रय होय. किंवा गरजांचा अभाव म्हणजे निरपेक्ष होय. वरील व्याख्याप्रमाणे किमान आवश्यक गरजांची पुर्वता करण्यासाठी आजच्या किंमतीप्रमाणे किती खर्च येईल. ते काढुन त्यापेक्षा कमी दरडोई खर्च असलेली लोकसंख्या निरपेक्ष दारिद्रयात आहे. निरपेक्ष दारिद्रय फक्त गरीब देशातच आढळुन येते.

**संशोधनाची उद्विष्टये.**

1) भारतातील मुस्लीम समाजा मधील दारिद्रयाच्या कारणांचा शोध घेणे.
2) भारतातील दारिद्रयाच्या समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी उपाय सुचविने.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकने वर्णणात्मक पध्दतीच्या वापर केला असुन संशोधन समस्येसंबंधीत अवश्यक असलेली तथ्य व माहिती द्वितीय स्त्रोतांच्या माध्यमातुन संकलित तथ्य केले आहे. यात विविध लेखकाचें संदंभ ग्रंथ, वर्तमान पत्रे, मासिक, विविध संस्थाचे अहवाल, इंटरनेट इत्यादी. महितीच्या स्त्रोंताचा उपयोग केला आहे.

**भारतीय मुस्लीमाचें दारिद्रयाची कारणे**

भारतातील दारिद्रयाची प्रमुख कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

1) **लोकसंख्यावाढ**

लोकसंख्येचा विस्फोट हे भारतातील दारिद्रय निर्माण होण्याचे प्रमुख कारण आहे. आर्थि विकासाची मुळे लोकांच्या वाढयाला न येण्याचे कारण म्हणजे लोकसंख्या वाढ होय. 1947 साली 36 कोटी लोकसंख्या झपाटयाने वाढत असुन त्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ कमी आहे. त्यामुळे दरडोई उत्पन्नात घट होते. सरकारचा पैसा उत्पादक स्वरूपाच्या कामावर खर्च होण्याऐवजी सार्वजनिक सोयी सुविधावर करण्यात खर्च होतो.

2) **शैक्षणिटृष्टया मागास**

मुस्लीम समाज शैक्षणिटृष्टया मागास आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती ही सुधारलेली नाही. कमी वयात त्यांना गरजा पुर्तीसाठी विविध नको ती कामे त्यांना अगदी कमी वयाम करावी लागते. म्हणुण ते शिक्षण वचिंत राहतात.

3) **बेरोजगारी**

बेकारी हे दारिद्रय निर्माण होण्याचे प्रमुख कारणे आहे. ज्या गतीने लोकसंख्या वाढते. त्या गतिने रोजगाराच्या संधी निर्माण होत नाहित काम नाही म्हणजे दाम नाही. उत्पन्न नाही म्हणजे मुलभुत गरजांही पुर्ण करता येत नाही. मुलभुत गरजांची अपुर्णता म्हणजे दारिद्रय होय.

4) **कौशल्यांचा अभाव**

अकुशलता हे दारिद्रयाचे म्हत्वाचे कारण आहे. आज विज्ञान व तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे. जिवनाच्या सर्वक्षेत्रात यात्रींक उपकरणाचा व तंत्रज्ञानाचा वापर दिवसे दिवस

वाढत आहे. त्यामुळे भारतातील पारपंरिक पुस्तकी शिक्षण घेणारे कौशल्याचा अभाव, अध्यावत तंत्रज्ञानाशी अभिज असणारे मणुष्यबळ पार्यायाने बेरोजगार होत आहेत. याच बरोबर भाव वाढ, शासकिय भ्रष्टाचार, पोकाळ योजनात्र दोषपुर्ण वित्तीय योजना, संदोष शिक्षण पध्दती, श्रममुल्यांचा व कार्यसंस्कृतिचा अभाव इत्यादी भारतातील दारिद्रयाची कारणे आहेत.

## दारिद्रय कमी करण्याचे उपाय

1) **लोकसंख्या नियंत्रण**

भारतातील आतिरिक्त लोकसंख्येचे नियंत्रण करणे अवश्यक आहे. शासकिय समाजिक व वैयक्तीक पातळिवर विविध उपाय योजना वाढत्या लोकसंख्येस आळण घालणे व वैयक्तीक पातळिवर विविध उपाय योजुन वाढत्या लोकसंख्येस आळण घालणे.

2) **बेरोजगारी कमी करणे**

ग्रामिण व शहरी भागामध्ये राजगार निर्माण करणे. यासाठी छोटया व लघु उदयोगसाठी अर्थसाहय्य कर सवलती देवुन उदयोगासाठी अनुकुल व पोषक वातावरण तयार करणे.

3) **उदयोगांचे विकेद्रिंकरण**

ग्रामिण भागात जागतिक दर्जाच्या पायाभुत सुविधांची बांधणी करून लघु व मोठया उदयोगाची स्थापना करावी. त्यातुन ग्रामिण भागामधिल मुस्लीम लोकाना किंवा इतर समाजामधिल लोकांना रोजगार उपलध्ध होउन. उपलध्ध श्रमशक्ती व नैसर्गिक सांधनाचा पर्याप्त वापर करता येईल. यातुन ग्रामविकास व दारिद्रय निर्मुलन तर होईल सोबत वाढते शहरिकरण, त्यातुन उद्दभवणाच्या झोपडपट्टी, वाढती गुन्हेगारी, बेकारी स्थंलातर यासारख्या अनेक समस्या नियंत्रणात येतील.

4) **इंटरनेटवर निर्बंध लावणे**

भारतात इंटरनेटच्या अतिवापरामुळे तरूण पिढित नकारात्मक अस्वस्था संवादाचा अभाव, आत्मके द्रितंपणा, उदासिनता इत्यादी मानसिक आजारांची वाढ होत आहे. इंटरनेटमुळे तरूण पिढी निष्क्रीय होत असुन कर्तव्य व समाजिक उत्तरदायीचे भान हरपले आहे. म्हणुन शासकिय तसेच कौटुबिं पातळिवर इंटरनेटच्या वापरावर कडक निर्बंध लावुन वापर नियत्रिंत करावा.

## निष्कर्ष

दारिद्रय अमिषाप नसुन मानवाच्या स्वर्थी व विकृत मनोवृतीचा अविष्कार आहे. दारिद्रयाची तिव्रता कमी करण्यासाठी अर्थिक विकसा बरोबरच समाजिक—अर्थिक न्याय व समानता प्रस्थापित करणे अपरिहार्य ओह. थोडक्यात विकासाच्या सर्वोद्यी दृष्टिकोनाचा भावना तसेच शाश्वत मुल्यांची प्रस्थापना हिच शाश्वत व सुरक्षित समाजाची शाश्वती आहे.

## संदर्भ

1) महाराष्ट्र टाईम्स, दारिद्रय निर्मुलनाची शोकांतिका, 17 ऑक्टोंबर 2012
2) महाराष्ट्र टाईम्स गरिबांचे अर्थशास्त्रज्ञ, डॉ भालचंद्र मुणगेकर 14 ऑक्टोंबर 2015
3) लोकसत्ता. दारिद्रय निर्मुलनासाठी 8—10 टक्के विकास दर गरजेचा, सॅम पित्रोदा मुखपृष्ठ मुंबई 02 एप्रिल 2013
4) Sikandar I.A.Y (2007)" survey of socio Economic conditions of Muslims In India"